क्रमांक : १६७६५ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ४ डिसेंबर, २०२०

**संदर्भ : या सचिवालयाचा कार्यालयीन आदेश क्र.१६५२६/क-१, दिनांक १ डिसेंबर, २०२०**

**उपरोक्त संदर्भाधीन कार्यालयीन आदेश अधिक्रमित करण्यात येऊन खालीलप्रमाणे सुधारित कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.**

**: : कार्यालयीन आदेश : :**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजीपासून सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने कामकाजाची तातडी लक्षात घेता तसेच राज्यातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा कोरोना विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिवेशनाच्या अगदी लगतपूर्वीचा अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने RT-PCR कोरोना चाचणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक ५ व ६ डिसेंबर, २०२० रोजी या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची १००% उपस्थिती अनिवार्य करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन कार्यालयीन आदेशान्वये कळविण्यात आले होते.

तथापि, गुरुवार, दिनांक ३ डिसेंबर, २०२० रोजी विधानपरिषद/विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आलेल्या बैठकीत कोवीड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उक्त अधिवेशन सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० ऐवजी सोमवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्याचे ठरले आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा कोरोना विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिवेशनाच्या अगदी लगतपूर्वीचा अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने RT-PCR कोरोना चाचणी करण्याची सुविधा दिनांक १२ व १३ डिसेंबर, २०२० रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहे. त्यानुषंगाने शनिवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२० व रविवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२० रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु राहणार असल्याने कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील. तसेच उपरोक्त दिवशी सर्व अधिकारी/कर्मचारी यांची १००% उपस्थिती अनिवार्य राहील.

आदेशानुसार,

**( ऋतुराज ज.कुडतरकर )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

...२/-

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) सर्व विधीमंडळ पक्ष कार्यालय.

१२) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१३) निवडसूची.

प्रतिलिपी :-

१) सर्व मंत्रालयीन विभाग.

२) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.